# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
# कर्जत–४१०२०१, जि. रायगड

जा.क्र.प्राकृसकें/किशावि/मजुर कंत्राटी कामे/822/२०२१,  दि. 19/04/2021

19 APR 2021

## जाहिर प्रसिध्दी (NOTICE)

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल किटकशास्त्र विभागाअंतर्गत प्रक्षेत्रावरील व प्रयोगशाळेतील कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने खरीप हंगाम २०२१ या हंगामाकरीता (०१ मे २०२१ ते माहे ३० ऑक्टोबर २०२१) करावयाची आहेत सदर काम करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या कामासाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दि.03/05/2021 पर्यत सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र
कर्जत–४१०२०१ जि. रायगड

**प्रत : प्रसिध्दीसाठी**

१. नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड
२. मा. कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती/नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी.
३. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४. ग्रामपंचायत, हालीवली, किरवली यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी अग्रषित.
५. विद्यापीठ संकेतस्थळ डॉ. बा. सा. को. कृ. विद्यापीठ, दापोली –४१५ ७१२, जि. रत्नागिरी.

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्र विभागात ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक**

दि. 19/04/2021

प्रति,

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

**विषय:** किटकशास्त्र विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्र विभागामधील प्रायोगिक प्रक्षेत्रांवरील व प्रयोगशाळेतील कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक

**संदर्भ: जा.क्र.प्राकृसकें/किशावि/मजुर कंत्राटी कामे/ /२०२१, दि. 19/04/2021**

आपल्या वरील संदर्भित पत्रान्वये किटकशास्त्र विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील किटकशास्त्र विभागामधील प्रक्षेत्रांवरील व प्रयोगशाळेतील विषयक कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी कामाचे दरपत्रक खालील प्रमाणे आहे.

| **कामाचा तपशिल** | **खरीप हंगामासाठी**<br>(०१ मे २०२१ ते माहे ३० ऑक्टोबर २०२१) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमुद केल्यानुसार किटकशास्त्र विभागामधील व प्रयोगशाळेतील कामे ठेका पध्दतीने करण्यासाठीचे दरपत्रक | रक्कम रुपये.............................. (रुपये ) मात्र |

मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत तरी माझे दरपत्रक मंजूर करावे ही विनंती.

सही : ..........................................

नांव : ..........................................

पत्ता : ..........................................

------------------------------------------

------------------------------------------

# ठेकाबाबतच्या सर्व साधारण अटी व शर्ती

2. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवष्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवष्यक राहील.

2. कामाच्या देयकाची आदायगी महिना पुर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/ प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पुर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवष्यक आहे.

3. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

4. ठेकेदाराकडे स्वतःचे पॅन कार्ड व बॅक खाते असणे आवष्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुष्यंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅक खाती जमा करणे आवष्यक आहे.

5. ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवष्यक आहे.

6. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

7. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना राहील.

8. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निष्चीत केलेली असावी.

9. याचिका क्र. 1591/2018 संदर्भात मा. उच्च न्यायलय मुंबई यांच्या दिनांक 18 एप्रिल, 2018 च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. 51 (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवष्यक आहे.

10. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रषासनावर राहणार नाही.

11. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

12. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रषासनाला राहतील

(ठेकेदार)

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,**

**कृषि किटकशास्त्र विभाग**

**विभागाच्या विविध प्रयोगांची व प्रयोगशाळेतील करण्यात येणा-या कामांची यादी**

**कालावधी–** ०१ मे २०२१ ते माहे ३० ऑक्टोबर २०२१

1) प्रक्षेत्रावर विविध पिकांच्या पेरणीकरीता गादी वाफे तयार करणे.
2) सदर रंगविलेल्या लाकडी पट्याांवर अनुंक्रमाक टाकणे.
3) सदर पट्याांची प्रक्षेत्रावर वाहतुक करणे.
4) चाचणी प्रयोगांच्या विविध वाणांसाठी असणाऱ्या लाकडी पट्याा साफ करून त्या रंगविणे.
5) खरीप हंगामातील AICRIP प्रयोगांची तसेच एजन्सी प्रयोगांची बियाणे खरीप हंगामाकरीता तयारी करणे.
6) गादी वाफ्यांवर उगवुन येणाऱ्या तणांची बेणणी करणे किंवा त्यावर तणनाषके फवारणे.
7) पेरणीच्या वेळी गादीवाफ्यामध्ये शेणखत टाकुन बुजवुन घेणे व पाणी व्यवस्थापन करणे.
8) गादीवाफ्यामध्ये बी रूजुन येईपर्यत राखण करणे. खतांची मात्रा देणे.
9) विविध प्रयोगांच्या प्रक्षेत्रातील बांध साफसफाई करणे.
10) विविध प्रयोगांच्या प्रक्षेत्रातील बेणणी करणे.
11) लावणी करण्यासाठी प्रक्षेत्राची मषागत करणे.
12) AICRIP व एजन्सी ट्रायल प्रयोगाची लावणी करणे. लागवडीनंतर त्यांना दिषा दर्षक बोर्ड लावणे.
13) प्रक्षेत्रातील भात पीकांना खतांची मात्रा देणे.
14) चाचणी प्रयोगाच्या कुंपणाच्या बाजुची झाडे तोडणे.
15) किटकनाषके चाचणी प्रयोगांच्या प्रक्षेत्रावर किटकनाषकांची फवारणी करणे.
16) विविध वाणांच्या चाचणी प्रयोगांची तसेच किटकनाषके चाचणी प्रयोगांची निरीक्षणे घेण्यास मदत करणे.
17) शेतकऱ्यांच्या शेतावर घेण्यात येणाऱ्या प्रयोगांची निरीक्षणे घेण्यास मदत करणे.
18) किटकनाषके चाचणी प्रयोगांच्या प्रक्षेत्रातील बेणणी करणे.
19) किटकनाषके चाचणी प्रयोगाच्या प्रक्षेत्रातील भात पीकाची कापणी करणे.
20) किटकनाषके चाचणी प्रयोगाच्या प्रक्षेत्रातील भात पीकांना कापणी केल्यानंतर झोडणी करणे व भात साफ करणे.
21) पेंढयाचे भारे बांधणे, पेंढयाचे तसेच भाताची वजने घेणे.
22) प्रयोगषाळेतील स्प्रेअर्स, डस्टर्स इ. उपकरणे स्वच्छ ठेवणे.
23) ऐनवेळी सांगण्यात येणारी सर्व कामे करणे.